महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन, कराड

विद्यानगर,कराड. ता. कराड जि.सातारा.

फोन नं.०२१६४-२७१४६२ (O), ०२१६४-२७१६३५ फॅक्स: 02164-272962
ई- मेल: gpkarad.dte@gmail.com वेबसाईट: www.gpk.ac.in


जा. क्र. शातंक /ITR /२०२५ / 1404 दि. 24 JUN 2025

**परिपत्रक**

**विषय : विद्यार्थ्यांच्या औद्योगिक प्रशिक्षणाबाबत**

**संदर्भ : MSBTE यांचे परिपत्रक क्र.मरातंशीमं / का -४० / परीक्षाविभाग -F3 /२०२५/८० दि. ०३.०३.२०२५**

उन्हाळी परीक्षा २०२५ चा निकाल नुकताच जाहीर करण्यात आलेला आहे. त्या अनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षणाबाबत (Inplant training) विद्यार्थ्यांनी खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. जे विद्यार्थी द्वितीय वर्षात अनुत्तीर्ण झाले असतील त्यांनी कोणत्याही परिस्थितीत प्रशिक्षण अर्धवट सोडू नये.तृतीय वर्षात प्रवेश घेणेपुर्वी औद्योगिक प्रशिक्षण पूर्ण करणे अनिवार्य आहे.

२. ज्या विद्यार्थ्यांनी द्वितीय वर्ष I scheme मध्ये पूर्ण केले आहे व ज्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये तृतीय वर्षात K scheme मध्ये प्रवेश घ्यायचा आहे अशा सर्व विद्यार्थ्यांनी बारा आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण (Inplant training) पूर्ण करणे अनिवार्य आहे. त्यांनी यापूर्वी सहा आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण केले असले तरीही बारा आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण पुन्हा करणे अनिवार्य आहे. याबाबत कोणतीही शंका असल्यास विभागप्रमुख यांचेशी संपर्क साधावा.

**औद्योगिक प्रशिक्षण अपूर्ण राहिल्याने शैक्षणिक नुकसान झाल्यास त्यास विद्यार्थी स्वतः जबादार राहील याची नोंद घ्यावी.**

24/6/25
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन, कराड

प्रत : १. सर्व विभागप्रमुख
२. संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत,४ था मजला,४९,खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२१००/११०

संकेतस्थळ : www.msbte.ac.in ई-मेल : director@msbte.ac.in


जा. क्र. मरातंशिमं/का-४०/परिक्षाविभाग-F३/२०२५/८० दिनांक – 03 MAR 2025

**महत्त्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
'K' Scheme पदविका अभ्यासक्रम राबविणा-या
मंडळाशी संलग्नित सर्व संस्था

विषयः 'K' Scheme अभ्यासक्रमातील पाचव्या सत्रातील Internship (12 weeks) विषयकोड - ३१५००४ या विषयाबाबत ...

संदर्भः १) मंडळाचे महत्त्वाचे परिपत्रक क्र. मरातंशिमं/का-५१/Kscheme/२०२५/१२५९, दि. २७/०२/२०२५
२) AE/AI/AN/AO/BD/CE/CH/CM/CO/CR/CS/CW/DE/DS/EE/EJ/EK/EP/ET/EX/HA/IE/IF/IH/LE/ME/MK/PG/SE/TE या अभ्यासक्रमातील पाचव्या सत्रातील Internship (12 weeks) (विषयकोड – ३१५००४) या विषयाचा पाठ्यक्रम

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळामार्फत AICTE मान्यता प्राप्त पदविका अभ्यासक्रमाच्या K-Scheme अंतर्गत पाचव्या सत्राची स्कीम व पाठ्यक्रम मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आला आहे. याबाबत संदर्भ क्र. १ मधील परिपत्रकान्वये कळविण्यात आले आहे. तसेच सदर परिपत्रकान्वये सर्व प्राचार्यांना पाचव्या सत्रातील ज्या अभ्यासक्रमांना १२ आठवड्यांचा Internship हा विषय आहे, त्या विषयाच्या पाठ्यक्रमात नमूद सूचीनुसार चालू (चतुर्थ) सत्रात काही पूर्व तयारी करणे अपेक्षित असून हि बाब संस्थेतील विभागप्रमुख यांच्या निदर्शनास आणावे, असे ही सूचित केले आहे.

तरी या परिपत्रकाद्वारे Inplant Training (12 weeks) (विषयकोड – ३१५००४) या विषयाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे सूचित करण्यात येत आहे.

१) जे विद्यार्थी चौथे सत्र K Scheme मध्ये पूर्ण करतील, अशा विद्यार्थ्यांनी K Scheme मधील पाचव्या सत्राच्या अभ्यासक्रमानुसार १२ आठवड्याचे Internship समाधानकारकरित्या पूर्ण करणे अनिवार्य राहील. तसेच ज्या विद्यार्थ्यांनी A/C/E/G/I या जुन्या स्किम मध्ये १ ते ४ सत्र पूर्ण केले आहे व K Scheme मधील पाचव्या सत्राकरीता पात्र होत असतील, अशा सर्व विद्यार्थ्यांनी सुद्धा K Scheme मधील पाचव्या सत्रातील १२ आठवड्याचे Internship पूर्ण करणे अनिवार्य राहील.

२) उपरोक्त विद्यार्थ्यांनी K Scheme मधील Internship समाधानकारकरित्या पूर्ण केले नसल्यास, अशा विद्यार्थ्यांना मंडळाच्या Examination Regulations (2018-19) नियम RG-6(B) मधील तरतुदीनुसार थोपविण्यात (Detain करण्यात) यावे.

तरी या परिपत्रकाद्वारे आपणांस सूचित करण्यात येते की, उपरोक्त सर्व विद्यार्थ्यांनी K Scheme मधील पाचव्या सत्रातील १२ आठवड्याचे Internship (विषयकोड – ३१५००४) या विषयाच्या पाठ्यक्रमात नमूद मानकाप्रमाणे पूर्ण करणे आवश्यक आहे. Internship पूर्ण न केल्यास होणा-या संभाव्य शैक्षणिक नुकसानीस विद्यार्थी जबाबदार राहील, याची संस्थाप्रमुखांनी विद्यार्थ्यांना जाणीव करून द्यावी. तसेच वरील सुचनांचे पालन करण्यात यावे व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांस अवगत करावे.

(डॉ. प्रमोद नाईक)
संचालक
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई

प्रत:

१) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, मुंबई यांना माहितीस्तव
२) उपसचिव, विभागीय कार्यालय – मुंबई, पुणे, नागपूर व छत्रपती संभाजी नगर यांना आवश्यक कार्यवाहीकरीता